महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष**
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२६/प्र.क्र.०७/जास्वीशु/सूचना/केंप्रप्र/२०२६/१७३३ दिनांक -१९.०७.२०२६

# जाहीर सूचना

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) अंतर्गत जागा स्वीकृती शुल्कामध्ये करण्यात आलेल्या सुधारणेबाबत...

संदर्भ - १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाची दिनांक ०२ जुलै, २०२६ रोजीची अधिसूचना (असाधारण क्रमांक ३८७).
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रमांक सीईटी-२०२५/प्र.क्र.७४६(ई-१६२२००८)/तंशि-४, दिनांक १७ जुलै, २०२६.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून तंत्रशिक्षण विभागांतर्गत प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) अंतर्गत जागा स्वीकृती शुल्कामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. यानुसार, विद्यार्थ्याला केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP ) मधील एकूण चार फेऱ्यांमध्ये कितव्यांदा जागा वाटप झाले आहे, त्यानुसार जागा स्वीकृती शुल्क आकारण्यात येईल. सदर शुल्क हे ना-परतावा (Non-Refundable) प्रक्रिया शुल्क असून, संबंधित प्रत्येक जागा स्वीकृतीच्या वेळी स्वतंत्रपणे भरावे लागेल.

जागा वाटपाच्या क्रमवारीनुसार लागू होणारे जागा स्वीकृती शुल्क पुढीलप्रमाणे राहील :

१. प्रथमच जागा वाटप झाल्यास : ₹ १,०००/-
२. सुधारणा प्रक्रियेद्वारे (Betterment) दुसऱ्यांदा नवीन जागा वाटप होऊन ती स्वीकारल्यास : ₹ २,०००/-
३. सुधारणा प्रक्रियेद्वारे (Betterment) तिसऱ्यांदा नवीन जागा वाटप होऊन ती स्वीकारल्यास : ₹ ३,०००/-

**स्पष्टीकरणात्मक उदाहरणे :**

१. विद्यार्थ्याला प्रथम केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP ) फेरीमध्ये जागा मिळाली व त्याने ती स्वीकारली, तर त्यास ₹ १,०००/- इतके जागा स्वीकृती शुल्क भरावे लागेल.
२. त्यानंतर पुढील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP ) फेरीमध्ये सुधारणा प्रक्रियेद्वारे (Betterment) नवीन जागा मिळाली, तर त्या नवीन जागेसाठी ₹ २,०००/- इतके जागा स्वीकृती शुल्क भरावे लागेल.
३. त्यानंतर पुन्हा सुधारणा प्रक्रियेद्वारे (Betterment) नवीन जागा मिळाली व विद्यार्थ्याने ती स्वीकारली, तर त्या जागेसाठी ₹ ३,०००/- इतके जागा स्वीकृती शुल्क भरावे लागेल.
४. जर एखाद्या विद्यार्थ्याला दुसऱ्या, तिसऱ्या किंवा चौथ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) फेरीमध्ये प्रथमच जागा वाटप झाले, तर ते विद्यार्थ्याचे प्रथम जागा वाटप मानले जाईल.

अशा विद्यार्थ्यास सदर वाटपातील जागेसाठी ₹ १,०००/- इतके जागा स्वीकृती शुल्क लागू राहील.

५. विद्यार्थ्याने एखाद्या फेरीतील जागा स्वीकारल्यानंतर पुढील फेरीमध्ये सुधारणा प्रक्रिया (Betterment) स्वीकारल्यास, त्या नवीन जागा वाटपासाठी त्या वेळेस लागू असलेले जागा स्वीकृती शुल्क भरावे लागेल.

टीप :

जागा स्वीकृती शुल्क हे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) मधील फेरीवर अवलंबून नसून, विद्यार्थ्याला कितव्यांदा जागा वाटप झाले आहे यावर अवलंबून असेल. त्यामुळे विद्यार्थ्याला प्रथमच जागा वाटप कोणत्याही केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) फेरीमध्ये झाले असले तरी ₹ १,०००/- इतकेच जागा स्वीकृती शुल्क लागू राहील. त्यानंतर सुधारणा प्रक्रिया (Betterment) द्वारे नवीन जागा स्वीकारल्यास अनुक्रमे ₹ २,०००/- व ₹ ३,०००/- इतके जागा स्वीकृती शुल्क भरावे लागेल.

सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत जागा वाटप झाल्यानंतर, जागा स्वीकारण्यापूर्वी वरील सुधारित शुल्क रचनेची नोंद घ्यावी व पर्याय अर्ज (Option Form) काळजीपूर्वक भरावेत.

सही/-

आयुक्त

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा

(सीईटी) कक्ष, मुंबई